# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: प्राथमिक शिक्षकांच्या दृष्टिकोणाचा अभ्यास

**डॉ. महादेव सदाशिव डिसले**
सहयोजी प्राध्यापज
शिजजशास्त्र महाविद्यालय, बार्शी
E-mail-sdisale४@gmail.com

## ➢ सारांश

शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मोठा वाव देण्यात आला आहे. २१ व्या शतकातले हे पहिले शिक्षण धोरण असून ३४ वर्ष जुन्या १९८६ च्या शिक्षणावरच्या राष्ट्रीय धोरणाची जागा नवे धोरण घेणार आहे. सर्वांना संधी, नि:पक्षपात, दर्जा, परवडणारे आणि उत्तरदायित्व या स्तंभावर याची उभारणी करण्यातआली आहे. २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र , बहुशाखीय. २१ व्या शतकाच्या गरजांना अनुरुप करत भारताचे चैतन्यशील प्रज्ञावंत समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या आगळ्या क्षमता पुढे आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. भारत सरकारच्या शिक्षण विभाजा जाहिर केलेले हे धोरणबलशाली भारत निर्मितीसाठी अत्यंत उपयोगी ठरणार आहे. या नवीन शैक्षणिक धोरजामध्ये प्रस्तावना नंतर एकूण चार भागात शिक्षण विषयक बाबींची मांडणी अत्यंत सुलभतेने करण्यात आलेली आहे. त्यातील पहिल्या भागाचा विचार संशोधकाने संशोधनात केला आहे. या पहिल्या भागामध्ये शालेय शिक्षणाविषयी प्रामुख्याने आठ बाबींचा विचार मांडण्यात आलेले आहेत.

सदर संशोधनात महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील चार तालुक्यांची बार्शी, माढा, मोहोळ, करमाळा यांची निवड सहेतूक नमुना निवड पध्दतीने केल्यानंतर या तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील ५० प्राथमिक शिक्षक असे २०० शिक्षकांकडून गुगल फॉर्मच्या आधारे प्रश्नावली भरुन घेण्यात आली. सदर प्रश्नावलीत उद्दिष्टाला अनुसरुन प्रश्न तयार करण्यात आली ही प्रश्नावली शिक्षण तज्ञांकडून तपासून घेण्यात आली होती. सदर संशोधनात शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करण्यात आला आहे. नंतर प्रश्नावलीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आले. नंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रति प्राथमिज शिक्षकांच्या सकारात्मक दृष्टिकोनसाठी शिफारशी करण्यात आल्या.

एक भाषित्वाकडून बहुभाषित्वाकडे असा हा एकसंध प्रवास करावं लागणार याची जाणीव ६० टक्के प्राथमिज शिजजांना होती.राष्ट्रीय शैजजिज धोरणानुसार बहुआयामी शिक्षणाची माहिती ६० टक्के शिक्षकांनी घेतली होती.राष्ट्रीय शैजजिज धोरजानुसार प्राथमिक शिक्षकांची भूमिकेचा अभ्यास ६५टक्के शिक्षकांनी केला होता.शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि मान्यता यासंबंधीची माहिती राष्ट्रीय शैक्षणिक धोरज २०२० मधून ५० टक्के प्राथमिक शिक्षकांनी घेतली होती.प्राथमिक शिक्षकांनी विविध विषयासंबंधी स्वतचे युट्युब चॅनल सुरु करावे.सामाजिक चेतना केंद्रे म्हणून मोफत शालेय पायाभूत सुविधा या योजनेसंबंधी प्राथमिक शिक्षकांना माहिती द्यावी.एनईपी २०२० मधील सारांशात्मक मूल्याकंनाकडून नियमित आणि रचनात्मक मूल्यांकनाची कल्पना यासंबंधी शिक्षणतज्ञांकडून माहिती प्राथमिक शिक्षकांना तरतूद करण्यात यावी.एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत भारताच्या भाषा या प्रकल्पाची माहिती प्राथमिक शिक्षकांना शासनाने प्रशिक्षणाच्या माध्यमातून द्यावी

***महत्त्वाच्या संज्ञा-*** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, प्राथमिक शिक्षक, दृष्टिकोण

## ➢ प्रस्तावना

**शा**लेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मोठा वाव देण्यात आला आहे. २१ व्या शतकातले हे पहिले शिक्षण धोरण असून ३४ वर्ष जु-या १९८६ च्या शिक्षणावरच्या राष्ट्रीय धोरणाची जागा नवे धोरण घेणार आहे. सर्वांना संधी, नि:पक्षपात, दर्जा, परवडणारे आणि उत्तरदायित्व या स्तंभावर याची उभारणी

करण्यातआली आहे. २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र , बहुशाखीय. २१ व्या शतकाच्या गरजांना अनुरुप करत भारताचे चैतन्यशील प्रज्ञावंत समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या आगळ्या क्षमता पुढे आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. भारत सरकारच्या शिक्षण विभागाने जाहिर केलेले हे धोरण बलशाली भारत निर्मितीसाठी अत्यंत उपयोगी ठरणार आहे. या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये प्रस्तावना नंतर एकुण चार भागात शिक्षण विषयक बार्बीची मांडणी अत्यंत सुलभतेने करण्यात आलेली आहे. त्यातील पहिल्या भागाचा विचार संशोधकाने संशोधनात केला आहे. या पहिल्या भागामध्ये शालेय शिक्षणाविषयी प्रामुख्याने आठ बाबींचा विचार मांडण्यात आलेले आहेत. अगदी प्रारंभिक अवस्थेपासून जेव्हा बालज तीन वर्षाचे असेल तेव्हापासून त्याच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन ठेवण्यात आलेला आहे. पायाभूत साक्षरता आणि गणिती प्रक्रिया यांना प्राथमिक शिक्षणात महत्वपूर्ण स्थान देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत. शिकणे हे सर्वांगीण तसेच एकात्मिक होण्यासाठी मदत करण्यात येणार आहे. घोकंपट्टी पासून शिक्षण व्यवस्थेत दूर करण्याचा मानस करण्यात आलेला आहे. शिक्षक हा सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुधारणांचा मार्गदर्शक स्त्रोत असणार आहे. शिक्षकांना आजच्या ज्ञान व्यवस्थापनाच्या काळातील आधुनिक तंत्र व संगणकीय ज्ञान यांच्या उपयुक्ततेची सांगड घालून शिकणे अत्यंत रंजक व शिकणाऱ्यास आनंद देजारे असावे यासाठी शिक्षकांना ऑनलाइन व इतर सर्व माध्यमातून प्रशिक्षित करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. प्रत्येक बालकाची शिकण्याची गती ही त्याची स्वतंत्र शैली असते, त्यानुसार प्रत्येक बालकाला त्याच्या त्याच्या अध्ययन शैली नुसार योग्य प्रकारच्या सुविधा शासन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणार आहे. समृध्द शिक्षणासाठी समृध्द अध्ययन योजना शिक्षणातील दर्जा ठरवणारी एक महत्वपूर्ण स्थिती आहे. अशा प्रकारचे समूह स्तरावर संसाधन केंद्र स्थापित करण्याचा शासनाचा मानस अत्यंत आधुनिक कसा आहे. शिक्षणाची उपयुक्तता ही सामाजिक उपयुक्ततेवर अवलंबून आहे. यासाठी बालकास दिलेले शिक्षण त्याला त्याची दैनंदिन जीवन जगण्यासाठी व जीवनमान उंचावण्यासाठी किती प्रमाणात सहाय्यभूत आहे याचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र अशा प्रकारचे सर्वांगीण यंत्रणा उभी करण्यात येत आहे. यासाठी शिक्षण विषयक मानके तयार करण्यात येत आहेत. प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टिने विविध बदलांचा स्वीकार प्राथमिक शिक्षकांनी एनईपी २०२०च्या धोरणाचा विचार कोणत्या पध्दतीने केला आहे. तसेच एनईपी २०२० प्रमाणे प्राथमिक शिक्षकांनी स्वत:मध्ये बदल करण्याची व त्यासाठी दृष्टिकोनामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. एऩईपी२०२० नुसार प्राथमिक शिजज ांनी दृष्टिकोनाचा स्वीकार कितपत केला आहे याचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधकाने हाती घेतले आहे.

### ➢ संशोधनाची गरज व महत्त्व

सदर संशोधनामुळे प्राथमिक शिक्षकांना एनईपी २०२० ची माहिती प्राप्त होईल, सदर संशोधनाच्या माध्यमातून एऩईपी २०२० च्या नुसार प्राथमिक शिक्षणासंबंधीच्या विविध माहितीचा आढाव घेता येईल. प्राथमिक शिक्षणासंबंधीच्या नाविण्यपूर्ण गोष्टींचे प्रशिक्षण शिजज ांना देण्यासाठी सदर संशोधनाची गरज आहे.प्राथमिज शिक्षणासंबंधी भविष्यातील शिक्षणाची माहिती प्राथमिक शिक्षकांना देण्यासाठी सदर संशोधनाची आवश्यकत आहे.

### ➢ संशोध-ा समस्या

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: प्राथमिक शिक्षकांच्या दृष्टिकोणाचा अभ्यास

### ➢ संशोधनाची उद्दिष्टे

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील शिक्षकासंबंधित बाबींचा शोध घेणे.
२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने प्राथमिक शिक्षकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बाबत प्राथमिक शिक्षकांच्या दृष्टिकोणाचा अभ्यास करणे.
४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बाबत प्राथमिक शिक्षकांचा अधिक सकारात्मक दृष्टिकोन होण्यासाठी अनुरुप शिफारशी सुचविणे.

➢ **संशोधनाची गृहितके**

1. शिक्षकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील बाबींची माहिती आहे.
2. प्राथमिक शिक्षकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील भूमिकेची माहिती आहे.
3. प्राथमिज शिक्षकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या विविध बाबींची माहिती घेतली आहे.
4. प्राथमिक शिक्षकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या विविध बाबींचा स्वीकार केला आहे.

➢ **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

सदर संशोधन महाराष्ट्राचा विचार केला आहे. महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याचा विचार केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील आकरा तालुक्याचा विचार केला आहे. आकरा तालुक्यापैकी चार तालुक्याचा विचार केला आहे.सदर संशोधनात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा विचार केला आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील प्राथमिज शिक्षकांच्या दृष्टिकोनाचा विचार केला आहे. सदर संशोधन शैजजिज वर्ष २०२०-२१ पुरते मर्यादित आहे.

➢ **संशोधनाची कार्यपध्दती**

सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. सदर संशोधनामध्ये असंभाव्यतेवर आधारीत सहेतुक नमुना निवड पध्दतीच्या आधारे महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील चार तालुक्यांची निवड सहेतूक नमुना निवड पध्दतीने करण्यात आली. या प्रत्येक तालुक्यातील ५० असे एकून २०० प्राथमिज शिजजांची नमुना निवड करण्यात आली आहे. सदर संशोधनासाठी प्रश्नावली जुजल फॉर्म पध्दतीनेभरुन घेण्यात आली. शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करण्यात आला आहे.

➢ **संशोधनाची ज ार्यवाही**

सदर संशोधनात प्राथमिज स्तरातील प्राथमिज शिक्षकांच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्यासद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे वर्णनात्मक संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. सदर संशोधनामध्ये सहेतुक नमुना निवड पध्दतीच्या आधारे महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे सोलापूर जिल्ह्यातील चार तालुक्यांची बार्शी, माढा, मोहोळ, करमाळा यांची निवड सहेतूक नमुना निवड पध्दतीने केल्यानंतर या तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील ५० प्राथमिज शिजज असे २०० शिक्षकांकडून गुगल फॉर्मच्या आधारे प्रश्नावली भरुन घेण्यात आली. सदर प्रश्नावलीत उद्दिष्टाला अनुसरुन प्रश्न तयार करण्यात आली ही प्रश्नावली शिक्षण तज्ञांकडून तपासून घेण्यात आली होती. सदर संशोधनात शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करण्यात आला आहे. नंतर प्रश्नावलीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आले. नंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रति प्राथमिक शिक्षकांच्या सकारात्मक दृष्टिकोनसाठी शिफारशी करण्यात आल्या.

➢ **प्राथमिज शिक्षकांच्या प्रश्नावली वरुन प्राप्त झालेले निष्ज र्ष**

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तील विविध बाबींची ८० टक्के प्राथमिक शिक्षकांना माहिती होती.
२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तील ५+३+३+४ या आकृतीबंधाची माहिती ७५ टक्के प्राथमिक शिक्षकांनी घेतली होती.
३. व्हर्च्युअल प्रयोगशाळा तयार करण्यासाठी दीक्षा या प्लॅटफॉर्मची माहिती ६८ टक्के प्राथमिक शिजजांनी घेतली होती.
४. व्हर्च्युअल प्रयोगशाळा साठी स्वयं आणि स्वयंप्रभा या प्लॅटफॉर्मची माहिती ४५ टक्के प्राथमिक शिजजांनी घेतली होती.
५. विशिष्ट अक्षमता (शैक्षणिक अक्षमतेसह) असलेल्या मुलांना कसे शिकवायचे याबद्दलची जागृती व ज्ञानासाठी ४५ टक्के प्राथमिक शिजजांनी उपक्रमाची तयारी केली होती.
६. मुलांमध्ये सर्वसाधारण अक्षर आणि गणिती साक्षरता करण्यासाठी ५० टक्के शिक्षकांनी यु ट्युब चॅनल तयार करण्याचा प्रयत्न करीत होते.
७. एक भाषित्वाकडून बहुभाषित्वाकडे असा हा एकसंध प्रवास कराव लागणार याची जाणीव ६० टक्के प्राथमिज शिक्षकांना होती.

८. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बहुआयामी शिक्षणाची माहिती ६० टक्के शिक्षकांनी घेतली होती.

९. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्राथमिक शिक्षकांची भूमिकेचा अभ्यास ६५टक्के शिक्षकांनी केला होता.

१०.शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि मान्यता यासंबंधीची माहिती राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधून ५० टक्के प्राथमिक शिक्षकांनी घेतली होती.

११.ऑनलाइन व ऑफलाइन या दृष्टिने अध्ययन अध्यापन करण्याची तयारी ७० टक्के शिक्षकांनी केली होती.

## ➢ शिफारशी

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या वाचनासाठी केंद्रशाळेने परिषदेचे आयोजन करावे.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा तील प्राथमिक शिजजासंबंधीचा आढावा घेण्यासाठी शिक्षणतज्ञांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करावे.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील बहुभाषिक शिक्षणाच्या दृष्टिने प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे.

४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मचा अभ्यास केलेल्या शिक्षकांनी इतर शिजज ांना प्रशिजज द्यावे.

५. शालेय गुणवत्ता मूल्यांकनासंबंधीची माहितीचे प्रशिक्षण जिल्हा शिजज व प्रशिजज संस्था मार्फत देण्यात यावे.

६. प्राथमिज शिजज ांनी विविध विषयासंबंधी स्वतचे युट्युब चॅनल सुरु करावे.

७. सामाजिक चेतना केंद्रे म्हणून मोफत शालेय पायाभूत सुविधा या योजनेसंबंधी प्राथमिक शिक्षकांना माहिती द्यावी.

८. एनईपी २०२० मधील सारांशात्मक मूल्याकंनाकडून नियमित आणि रचनात्मक मूल्यांकनाची कल्पना यासंबंधी शिक्षणतज्ञांकडून माहिती प्राथमिक शिक्षकांना तरतूद करण्यात यावी.

९. एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत भारताच्या भाषा या प्रकल्पाची माहिती प्राथमिक शिक्षकांना शासनाने प्रशिक्षणाच्या माध्यमातून द्यावी.

१०.प्राथमिक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाच्या दष्टिने शालेय अभ्यासक्रमाची माहिती अभ्यासक्रम तज्ञ मंडळीकडून प्राथमिक शिक्षकांना राज्य शासनाने द्यावे.

## ➢ संदर्भ ग्रंथ सूची

१. मुळे रा.श., उमाटे वि.तु.., (१९९८), 'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे' (तिसरी आवृत्ती), औरंगाबाद: विद्या बुक्स.
२. वाघमारे जनार्दन., (१९९३), 'आजचे शिक्षण स्वप्न आणि वास्तव' (प्रथम आवृत्ती), पुणे: सुरेश एजन्सी.
३. कौस्तुभ जोशी, (२०२०), ऑनलाइन शिक्षण ही भविष्यवेधी गुंतवणुकच, orfonline.org
४. विशाल गंगुरडे, (२०२०), शैजजिज धोरण:महत्त्वाचे पाऊल, महाराष्ट्र टाईम्स.
५. मृणाल जोशी, (२०२०), नव्या शैक्षणिक धोरणाची दिशा, orfonline.org
६. प्रसाद शिरगांवकर, ऑनलाइन व ऑफलाइन उद्याचे शिजज (२०२०), orfonline.org
७. http://www.stafnews.in
८. www.shikshaniti.com
९. http://www.education.gov.in
१०. http://mr.vikaspedia.in
११. http://maharashtratimes.com